MHKO180006542023

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४०/२०२३ मधील**
**निशाणी क्र.३५ खालील आदेश.**
**(गिरीष विनायक घोलकर वि. वंदना बळवंत कामत)**

अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांच्या कथनानुसार, गैरअर्जदार यांनी या न्यायालयातून दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०२/२०२३ या प्रकरणातील दिनांक १०.०४.२०२३ रोजीच्या आदेशानुसार मिळविलेला मयत वासंती दत्तात्रय घोलकर यांचा वारसा दाखला रद्द होवून मिळण्याकरीता अर्जदार यांनी प्रस्तुतचे प्रकरण दाखल केले आहे. प्रस्तुत अर्जदार यांनी मयत वासंती दत्तात्रय घोलकर यांचा वारसा दाखला मिळण्याकरीता दिवाणी न्यायालय, राधानगरी येथे दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२३ हे प्रकरण दाखल केले होते. प्रस्तुत अर्ज प्रलंबीत असतेवेळी अर्जदार यांनी दिवाणी न्यायालय, राधानगरी येथील दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२३ हे प्रकरण दिनांक २०.०८.२०२४ रोजी काढून घेतले असून त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणातील मुळ अर्जामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. मुळ अर्जामध्ये उपरोक्त नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास गैअर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, मुळ अर्जामध्ये उपरोक्त नमूद दुरुस्ती न केल्यास अर्जदार यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची अर्जदार यांनी विनंती केली आहे.

०३. गैअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. प्रस्तुतचा अर्ज खोटा व लबाडीचा असल्यामुळे आणि प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांचा पुरावा चालू असून अर्जदार यांनी उशिराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती गैअर्जदार यांनी केली आहे.

०४. अर्जदार आणि गैअर्जदार यांचे विद्यमान वकील यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. उभयपक्षांतर्फे त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद करण्यात आला.

०५. मुळ अर्ज, गैरअर्जदार यांचे लेखी म्हणणे, प्रस्तुत अर्ज आणि त्यावर गैअर्जदार यांनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले

असता असे दिसुन येते की, या न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०२/२०२३ या प्रकरणातील दिनांक १०.०४.२०२३ रोजीच्या आदेशानुसार गैरअर्जदार यांनी मिळविलेला मयत वासंती दत्तात्रय घोलकर यांचा वारसा दाखला रद्द होवून मिळण्याकरीता अर्जदार यांनी प्रस्तुतचे प्रकरण दाखल केले आहे. गैरअर्जदार यांनी मयत वासंती दत्तात्रय घोलकर यांचा वारसा दाखला मिळण्याकरीता दिवाणी न्यायालय, राधानगरी येथे दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२३ हे प्रकरण दाखल केले असून प्रस्तुत प्रकरण प्रलंबीत असतेवेळी गैरअर्जदार यांनी दिवाणी न्यायालय, राधानगरी येथील दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२३ हे प्रकरण दिनांक २०.०८.२०२४ रोजी काढून घेतल्यामुळे त्या अनुषंगाने मुळ अर्जामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यासाठी अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

०६. अर्जदार यांनी प्रस्तुतचे प्रकरण त्यांच्या उलटतपासाकरीता प्रलंबित असतेवेळी प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे दिसून येत आहे. परंतु, दिवाणी प्रक्रिया संहिता यामधील सुधारीत कलम VI नियम १७ चे उपबंध हे आज्ञार्थी नसून निदेशक उपबंध असल्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **बलदेव सिंग व इतर विरुद्ध मनोहर सिंग व इतर [2006 (5) ALL M.R. 107 (S.C.)]** आणि मा. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या **भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. वि. प्रेशियस फायनान्स इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. [2006 ALL M.R. 771]** या न्यायनिर्णयांमध्ये विशद करण्यात आले आहे. त्यामुळे, अर्जदार यांनी प्रस्तुतचे प्रकरण त्यांच्या उलटतपासाकरीता प्रलंबित असतेवेळी प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याच्या एकमेव कारणावरुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करता येणार नाही.

०७. याउलट, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तावित दुरुस्ती ही मुळ अर्जाचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, अर्जदार यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे गैअर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व मुळ अर्जाच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. अर्जदार यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/– इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

## :: आदेश ::

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत मुळ अर्जामध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन मुळ अर्जाची दुरुस्ती प्रत प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल करावी. तसेच, दुरुस्त मुळ अर्जाची एक प्रत गैरअर्जदार यांना द्यावी.

३. अर्जदार यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) गैअर्जदार यांना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.09.11 18:03:33 +0530

दिनांक : ११.०९.२०२५ (बाळासाहेब श्री. गायकवाड)

कुरुंदवाड. दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,

कुरुंदवाड.